
अंतरंग
शंभू गणपुले

# अंतरंग

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अंतरंग

लेखक - शंभू गणपुले

ई साहित्य प्रतिष्ठान

# अंतरंग

लेखक : शंभू गणपुले

" योगिनी", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

संपर्क :जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038 020-25384472, 9822439492

jayant. karandikar@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.
google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन :२४ जुलै २०१८**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

लेखकाचा परिचय



लेखक: श्री. महादेव परशुराम उर्फ शंभू गणपुले

वय : आठ्ठ्याहत्तर

शिक्षण: बी. ए. , एल. एल. बी. , हिंदी

विशारद

व्यवसाय: सेवानिवृत्त अधिकारी, नाबार्ड,

सध्या लेखन,

प्रकाशित लेखन: " ताओ उपनिषद" , कथा-कविता संग्रह -२

विशेष रुची: आतापर्यंत वेगवेगळया संस्थामधून १० नाटके बसविली. त्यात कामही केले. २ दूरदर्शन मालीकांचे ( साळसूद, घरकूल) लेखन, एका मालिकेत काम,

निवास: "योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

©सर्व हक्क श्री. र यांचे स्वाधीनजयंत करंदिक.

जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,
Pune 411038 020-25384472, 9822439492

# अंतरंग

## (मालिकेचा कथा सारांश)


लेखक - शंभू गणपुले

# अर्पण पत्रिका

’ज्यानी माझ्यामधे लेख़नाची उर्मी निर्माण केली आणि माझ्याकडून काही लेखन करून घेतले ते माझे आजोबा   -माझ्या आईचे वडील- विद्यावाचस्पती श्री कृष्णाजी केशव कोल्हटकर, यांच्या स्मृतीस माझे सर्व लेखन मी समर्पित करत आहे.


-- शंभू गणपुले


शंभू गणपुले यांची ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े प्रकाशित झालेली पुस्तके









# अंतरंग

एका सुशिक्षित, मध्यम वर्गातल्या कुटुंबातील अनुश्री नावाची तेरा-चौदा वर्षांची एक मुलगी. दिसायला सुंदर, अभ्यासात हुशार व मनमिळाऊ. तिच्या लोभस व्यक्तिमत्वामुळे ती तिच्या आई-वडिलांची, उमाची (मोठी बहिण) आणि डॉ. दिनेशची (उमाचा भावी पती) तसेच शिक्षक व शेजाऱ्यापाजाऱ्यांची खूप लाडकी आहे.

एक दिवस अनुश्रीच्या आयुष्यात खळबळ माजते.

अनू तिच्या मैत्रिणीबरोबर ऑटोरिक्षानं शाळेत जात असतांना रिक्षातलं पेट्रोल संपतं. रिक्षा बंद पडते. अनू व तिची मैत्रिण पायी पायी जाऊ लागतात. ती वाट झोपडपट्टीतून जात असते. एक गुंड एका विवाहित तरुणीला फरपटत नेत असतांना अनू बघते. अनुला भयंकर राग येतो. त्या मुलीची गुंडापासून सुटका करण्यासाठी अनु गुंडाशी झटापट करते. त्याच्या थोबाडीत मारते. त्या झटापटीत अनू खाली पडते. तिच्या डोक्याला मार लागतो. तशा अवस्थेतच तिची मैत्रिण तिला कसंबसं शाळेपर्यंत घेऊन जाते. शाळेत तिच्या वर्गशिक्षिका तिला औषधपाणी करून घरी पाहोचवतात.

अनुची ती अवस्था पाहून उमा घाबरते. अनुची शिक्षिका सांगते की, 'त्या घटनेनंतर अनू विचित्र गोष्टी सांगायला आणि स्केचेस तयार करायला लागलीय. ' त्यापैकी एका स्केचमध्ये एक लाठीबाज एका तरुणीला जबरदस्तीनं ओढत नेतो आहे, असं चित्र तिनं रेखाटलं आहे. 'त्या चित्रात रेखाटलेली तरुणी ती स्वतःच आहे, आणि ती लाठीबाजाच्या मालकाचा बदला घेणार आहे,' अस बडबडल्याचंही शिक्षिका सांगते. या विचित्र घटनांमुळे घरातले सर्व चिंतेत आहेत. ती खाली पडल्यामुळे कदाचित तिच्या मेंदूला धक्का पोहोचला असेल, अशी कल्पना करून डॉ. दिनेश तिला ट्रिटमेंट सुरू करतो. पण रात्री तिची तब्येत आणखी बिघडते.

झोपेच्या गोळ्या खाऊन अनुश्री वैतागली आहे. तिच्या प्रकृतीत जरासुद्धा सुधारणा झालेली नाही. रोजचे व्यवहार चालू असतांना अनु अचानक ती चित्रातली मुलगी (जिचं नाव कानन आहे, असं अनुच सांगते. ) आणि एक थेरडा यांच्याबद्दल बोलायला लागते. काननच्या जीवनात घडून गेलेल्या काही घटनांचं वर्णन करायला लागते. त्यामुळे कुटुंबातले सगळेपण संभ्रमात पडतात. याचं मुख्य कारण असं की अनू आणि कानन या दोन व्यक्तीमत्वामधली सीमारेषा अगदी अस्पष्ट आहे. डॉ. दिनेश अनुला सायकॅट्रिस्टकडे घेऊन जातो. सायकॅट्रिस्ट वेगवेगळ्या प्रकारच्या चाचण्या घेऊन अनू अगदी नॉर्मल असल्याचा निर्वाळा देतो. 'अनू काहीतरी बडबडत राहते म्हणून तिच्याकडं दुर्लक्ष करू नका, एव्हढंच नव्हे, तर कुटुंबातच्या सगळ्यांचं तिला जास्तीत जास्त प्रेम द्या' असा सल्लाही देतो.

अनुला हस्तकलेच्या वस्तू तयार करण्याचा छंद आहे. कधी कधी ती गाते सुद्धा. परंतु तिच्या स्केचेस, हस्तकला, गाणी या सर्वावर ग्रामीण जीवनाची छाप आहे.

जसजसे दिवस जातात. तसतशी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवू लागते की, अनुच्या व्यक्तिमत्वाचे पैलू हे काननच्या व्यक्तिमत्वाच्या पैलू सारखेच आहेत. डॉ. दिनेश व उमाचं लग्न ठरतं. उमाचे वडील पहिल्यापासूनच तयार असतात.

एक दिवस दिनेशच्या वडिलांचे पण पत्र येतं की ते साखरपुडा करायला येत आहेत. साखरपुड्याच्या दिवशी दिनेशच्या आई-वडिलांबरोबर दिनेशच्या आईचे गुरुबंधूही येतात. रवि (उमाचा मित्र आणि एका वृत्तपत्राचा वार्ताहर) साखरपुड्याचे फोटो काढण्यासाठी आला आहे. गुरुबंधूना बघून अनु किंचाळते. 'हाच तो खडूस थेरडा, ज्यानं काननला विकत घेतलं होतं. ' साखरपुड्याचे विधी न करताच पाहुणे निघून जातात. उमाचा साखरपुडा मोडल्यामुळे अनू आणि परिवारातील अन्य लोकांमध्ये एक प्रकारचा तणाव निर्माण होतो. हे जेव्हा अनूच्या लक्षात येतं,

तेव्ही ती रडायला लागते व स्वतःला एका खोलीत कोंडून घेते. आई-वडील आणि उमा घाबरतात. तिला समजावतात, आणि तिला खोलीच्या बाहेर काढतात.

रवि (वार्ताहर) आपल्या वर्तमानपत्रात साखरपुड्याचा सर्व वृत्तांत जसाच्या तसा छापतो, आणि अनू ही पुर्वजन्मीची कानन असावी, त्यामुळेच तिने गुरुबंधूला ओळखलं, असा शेरा पण मारतो.

अनूच्या कुटुंबात परत खळबळ माजते. जी समस्या एका परिवारापुरतीच मर्यादित होती. ती आता चव्हाट्यावर येते, लोकांच्या चर्चेचा विषय बनते. घरी वेळी-अवेळी निनावी फोन येऊ लागतात. त्या घटनेनंतर दोन-तीन दिवस डॉ. दिनेश पण उमाला भेटायला न आल्यामुळं घरात आणखीनच संशयाचं आणि चिंतेचं वातावरण पसरतं. उमा त्याला भेटायला जाते. दिनेश उमाला विश्वासानं सांगतो की, ‘आई-वडिलांना सोडायला मी मुंबईला जायचं असंच ठरलं होतं. त्या प्रकारानंतर आई-वडील चिडले असले तरी मी तुझ्याशीच लग्न करणार आहे. ’ उमा आश्वस्त होऊन घरी परत येते.

वर्तमानपत्रात छापून आलेले रिपोर्टस् वाचून पॅरा-सायकॉलॉजीमध्ये संशोधन करणारी कविता नावाची मुलगी अनुच्या घरी येते. ती अनुच्या केसचा अभ्यास करण्याची इच्छा प्रकट करते. इतकेच नाही, तर अनुला रामपूरला घेऊन जायची इच्छाही दर्शविते. अनुचे वडील अभ्यासासाठो परवानगी देतात. पण अनू रामपूरला जाणं शक्य नाही, असेही कडक शब्दात सुनावतात.

कविता अनुच्या घरीच राहू लागते. दोन-चार दिवसांतच परिवारातील सर्वजण तिच्याशी खुल्या दिलाने वागू लागतात. त्यामुळे कवितासुद्धा निःसंकोचपणे त्यांच्या परिवारापैकीच एक आहे, अशाच पद्धतीने वावरू लागते.

अनुला समोर बसवून तिच्याकडून हवी असलेली माहिती काढून घेणं तितकं सोपं नाही, याची कविताला कल्पना आहे. कारण 'मागच्या आठवणी या वाऱ्याच्या झोतासारख्या येतात अन् जातात,' हे कविताला अनुभवांती पटलेलं आहे. त्यामुळे जास्तीत जास्त वेळ ती अनुच्या संगतीत घालवून मिळेल तेवढी माहिती गोळा करते.

एकदा अनू कविताला आपले चित्रकलेचे नमुने दाखवत असते. एका चित्रात अनुने झाडाखाली बसलेली कानन रंगवली आहे. त्याचं स्पष्टीकरण करतांना अनू कानदनची गोष्ट सांगायला सुरुवात करते. 'कानन गरीब आई-वडिलांची मुलगी हाती. आई जरा रागीट होती. गावातील मंदिराच्या पुजाऱ्याचा मुलगा, माधव, तिला वेळोवेळी मदत करायचा, मार्गदर्शन करायचा. ' अचानक अनु थांबते. गोष्ट तेवढ्यावरच राहते.

कविता अनुच्या कुटुंबातील व्यक्तिंशिवाय अनुच्या संबंधात येणाऱ्या इतर लोकांकडून म्हणजे वर्गशिक्षक, मैत्रिणी, शेजारीपाजारी यांच्याकडे चौकशी करून, चार-पाच दिवसात बरीच माहिती गोळा करते, आणि रामपुरला जाण्याचा बेत आखते. पुन्हा तोच तिढा, कविताबरोबर अनुनं जायचं की नाही? अनुचे वडील पुन्हा स्पष्ट नकार देतात. एवढंच नाही, तर कविताने सुद्धा एकटीनं रामपूरला जाऊ नये, असा आग्रह धरतात. शेवटी बऱ्याच चर्चेनंतर रविने तिच्याबरोबर जावे, असे ठरते.

रवि आणि कविता, अनुने काननबद्दल सांगितलेल्या गोष्टी आणि रामपूरमधील मिळालेली माहिती यांची जेव्हा तुलना करतात, तेव्हा आश्चर्यचकित होतात, कारण गावकऱ्यांनी सांगितलेल्या माहितीवरून असं आढळून येतं, स्थळं, घटना, माणसं आणि त्यांची नावं तंतोतंत जुळत आहेत.

काननचा पुनर्जन्म झालेला आहे आणि ती सध्या एका मोठ्या शहरात रहात आहे, हे ऐकून गावांत खळबळ उडते. बरेचसे लोक काननच्या छोट्या-मोठ्या गोष्टी कविताला आणि रविला ऐकवतात.

गावांत कविता आणि रवि आल्याची बातमी गुरुबंधूंना समजते. गुरुबंधूंना गावकरी अनेक नावांनी ओळखत असतात. हल्ली ते ‘दिनदयाळ’ या नावानं ओळखले जातात. त्यांच्या विरोधात बोलणारे काही निवडक लोक पण गावांत आहेत. दिनदयाळ, कविता आणि रविला त्यांच्या हवेलोवर येण्याचं निमंत्रण देतो. आणि त्यांना काननच्या काही आठवणी सांगतो. त्यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, कानन ही त्यांची दुसरी बायको होती आणि तिचे अपघाती निधन झाले होते. रवि आणि कविता काननच्या आई-वडिलांना भेटण्याचा प्रयत्न करतात. पण तिथे गेल्यावर शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून कळतं की, काननच्या मृत्यूनंतर तिची आई वेडी झाली होती, आणि वडिलांचा अजून पत्ता लागलेला नाही. काननच्या घराबाहेर काही गुंड रवि आणि कविताला पकडतात आणि गावाबाहेर हाकलून देतात.

कविता आणि रवि परत येतात. आत्तापर्यंत मिळालेल्या माहितोच्या आधारे काननच्या जीवनातील काही महत्त्वाच्या घटनांचा क्रम पुढीलप्रमाणे लावतात.

कानन आणि मंदिरातील पुजाऱ्याचा मुलगा माधव एकमेकांना वारंवार भेटत असतात माधव तिला अनेक गोष्टी शिकवतो. वेळोवेळी मदत पण करतो. त्यामुळे अन्यायाविरुद्ध लढणारी एक निडर व्यक्ती म्हणून कानन ओळखली जाऊ लागते. दिनदयाळच्या साम्राज्याला धक्का बसतो. कानन पुजाऱ्याच्या मुलावर लट्टू आहे, ही गोष्ट गावभर पसरते. माधव काननला समजावतो. काननचे आईवडीलपण तिला धमकी देतात. परंतु त्याचा काहीही परिणाम होत नाही. दोघांचे भेटणे चालूच राहते.

दिनदयाळ काननच्या वडिलांना मोठ्या रकमेची लालूच दाखवून जाळ्यात अडकवतो आणि काननबरोबर लग्न करतो. त्यांची पहिली रात्र ही रक्तरंजित रात्र होते. दिनदयाळ खोलीत आल्यावर कानन त्यांच्यावर हल्ला करते. त्या हाणामारीत कंदील अंथरुणावर पडतो. बिछान्याबरोबरच काननचं वैवाहिक जीवन पण भस्मसात होतं. त्या दिवसापासून काननची आई वेडी होते आणि बाप अचानक नाहीसा होतो.

कानन गावचे पंच-सरपंच यांच्याशीपण अधिकारवानं बोलू लागते. छोट्या-मोठ्या बाबतीत स्वतःच न्यायनिवाडा करायला लागते.

सावकारोच्या कारभारात काननचं लक्ष घालणे, दिनदयाळला पसंत नाही. काननचं दिनदयाळबरोबर प्रत्येक गोष्टी भांडण सुरु होते. व्याजावर सवलत देणे, कर्ज घेतलेले कागदपत्र फाडून टाकणे, कर्जवसुलीसाठी कोर्टात दाखल केलेले खटले काढून घेणे, जप्ती परतवून लावणे इ. लपडी करतच राहते. या सर्वाला वैतागून दिनदयाळ एक दिवस तिच्यावर हात उगारतो. कानन त्याचा हात धरून ठेवून तंबी देते की, 'म्हाताऱ्यानं तरूण मुलींशी लग्न करण्याचं पाप करू नये. त्या पापाची फळं अशी भोगावी लागतात. ' दिनदयाळ बरोबर भांडण झालं की, कानन हवेलीच्या बाहेर जाई. कधी कानन मंदिरात जाई, तर कधी माधवला हवेलीत बोलावून घेई. दिनदयाळची झोप उडवायला हे प्रकार पुरेसे असतात. एक दिवस एक नोकर येऊन काननला सांगतो की, माधवला साप चावला आहे आणि तो तुमची आठवण काढतो आहे. धावत पळत कानन मंदिरात जाते. परंतु तिथे कुणीच नसतं. मंदिराच्या गाभाऱ्याच्या अंधारात दोन लाठीधारी तिच्यावर हल्ला करतात. तिचं प्रेत मंदिराच्या आवारातल्या विहिरीत टाकून देतात आणि 'मालकीण पाय घसरून विहिरीत पडून मेली' अशी बोंब मारतात.

अनुची आई तिच्या कपाळावर बघते. खरोखरीच तिला कपाळाच्या डाव्या बाजूस एक खूण दिसते. आजपर्यंत सर्वजण ती खूण म्हणजे जन्मखूणच आहे, असं मानत असतात.

इतक्या गोष्टी जुळत असूनसुद्धा दिनेश, उमा आणि तिचे वडील काननचाच अनुच्या रुपांत जन्म झाला आहे, असं मानायला अजिबात तयार नसतात. हा नक्की पुनर्जन्मच आहे, असं शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करण्याचा कुठलाच उपाय कविताकडे नसतो.

रात्रीच्या वेळी रवि, कविता, उमा, दिनेश गप्पा मारत बसलेल असतात. कविताचे ध्येय साध्य झाले आहे. अनुच्या केससंबंधात सर्व माहिती मिळवण्याचे काम संपल्यामुळे कविता आता परत आपल्या गावी जाण्यासंबंधी विचार करते. रवि तिच्याशी वाद घालतो की, काननचा मृत्यू संशयास्पद परिस्थितोत झाल्याचें जर आपल्याला कळलं आहे, तर आपल्याला या गोष्टीचा पाठपुरावा करायला हवा. दोघांची चर्चा चालू असतांनाच बंदुकीतून गोळी उडल्याचा आवाज येतो. त्या पाठोपाठ अनुची किंकाळी ऐकू येते. उमा आणि कविता अनुच्या खोलीकडे धावतात. रवि आणि दिनेश गेटकडे धाव घेतात. एक व्यक्ती पळण्याच्या प्रयत्नात असते. रवि त्याला पकडण्याचा प्रयत्न करतो पण त्या माणसाच्या झब्ब्याचा खिसा फाटून रविच्या हातात येतो. त्या खिशात काही रुपये व रामपूर ते पुणे असं रेल्वेचं तिकीट सापडतं. पोलीसांना फोन करून बोलावण्यात येतं. सर्व हकीकत सांगितली जाते. पोलीस पंचनामा करतात. फाटलेला खिसा, रेल्वेचं तिकीट जप्त करतात.

दिनदयाळनंच अनुवर खुनी हल्ला करवला आहे, याबद्दल दिनेश व रविची खात्री पटते. दिनदयाळची पाळमुळं खणून काढलीच पहिजेत, असा सर्वजण विचार करतात. सी. आय. डी. च्या मदतीनं अनुला रामपरला नेऊन जितके पुरावे मिळतील तितके गोळा करायचे, असे ठरले.

अनुच्या बाबांची पण या योजनेला परानगी मिळते.

अनुवर खुनी हल्ला झाल्याची बातमी शहरात पसरते. दक्षता समिती, स्त्री मुक्ती आंदोलन इ. संस्था अनुच्या परिवाराला मदत करायला पुढे सरसावतात. पोलीस खात्यावर दबाव आणून अनुच्या संरक्षणासाठी दोन पोलीस ठेवण्याची व्यवस्था केली जाते. बाकीची व्यवस्था झाल्यावर पोलीसांच्या संरक्षणात अनु, रवि, कविता आणि अनूचे बाबा रामपूरला रवाना होतात. प्रथमच रामपुर स्टेशन मास्तरांकडून कळतं की, त्या दिवशी पुण्याचं फक्त एकच तिकीट विकलं गेलं होतं आणि ते तिकीट हरिया नावाच्या दिनदयाळच्या नोकरानं विकत घेतले होते. अनु रामपूरला आली, हे कळल्यावर सारं गांव भूकंप झाल्यासारखं हादरते ! गावकऱ्यांची मने बेचैन होतात. आपआपसात कानन बद्दल चर्चा सुरु होते. तिने केलेल्या काही काही चांगल्या गोष्टी लोकांना आठवायला लागतात. त्यामुळे अनुच्या रुपांत काननला बघण्यासाठी प्रत्येकजण धडपड करतो. अनुश्री जेव्हा मंदिरात पोहोचते, तेव्हा ती माधवचा शोध घेते. तेव्हा असे कळते की, 'ज्या दिवशी काननचा खून झाला त्या दिवसापासून माधव पण गायब झाला आहे. '

छोट्या छोट्या अनेक गोष्टींवरून व लोकांनी केलेल्या वर्णनावरून, दिनदयाळ अट्टल गुन्हेगार आहे, त्यानेच काननचा खून आणि इतर अनेक छोटे-मोठे गुन्हे केलेले आहेत, परंतु त्याने आपले रेकॉर्ड ठीकठाक ठेवल्यामुळे किंवा स्थानिक अधिकाऱ्यांचे हात सतत ओले केल्यामुळे त्याला कचाट्यात पकडता आल नाही. ही गोष्ट पोलिसांना कळून चुकते. दुसऱ्या दिवशी बाबा, रवि, पोलीस इन्स्पेक्टर, कविता व अनू दिनदयाळला न कळविता हवेलीवर धाड टाकतात. अनू तिथल्या अनेक वस्तू ओळखते. हवेलीत एक तळघर आहे. त्या तळघरांत जाण्याचा जिना भिंत घालून बुजवून टाकल्याचे अनु सांगते. तळघरांत हरियाचा फाटका झब्बा व दोन माणसांच्या हाडांचे सापडतात. काननचे वडील आणि माधव यांचे ते सांगाडे असावेत असा इन्स्पेक्टरला संशय येतो.

सर्व पुरावे घेऊन अनूसह सगळे परत येतात. दिनदयाळविरुद्ध भारतीय दंड विधानाच्या आधारे खटला भरला जातो. सरकारतर्फे अनेक पुरावे, साक्षीदार सादर केले जातात. बचाव पक्ष वारंवार एकाच गोष्टीवर भर देत राहतो की, या खटल्याचा पायाच मुळी पुनर्जनमची कल्पना आहे, जी अशास्त्रीय व तर्कहीन आणि भ्रामक आहे. खरं म्हणजे दिनदयाळ विरुद्ध डॉ. दिनेश आणि अनूच्या परिवारानं रचलेले हे फार मोठ षडयंत्र आहे. खटल्याला अचानक अनपेक्षित असं वळण मिळते. दिनदयाळनं डॉ. दिनेशला मध्ये खेचल्यामुळे दिनेश आणि अनुच्या कुटुंबातील सर्वजण चक्रावून जातात.

बचाव पक्षातर्फे उमा, डॉ. दिनेश, कविता यांना साक्षीदाराच्या रुपात उभे केले जाते. डॉ. दिनेश आणि दिनदयाळ हे दोघे एकमेकांचे कट्टर शत्रु होते, हे सिद्ध करून डॉ. दिनेशच अनुश्रीला रामपुर, कानन, दिनदयाळ आणि माधवच्या बाबतीत माहिती पुरवत होता व लोकांना चिथवण्यासाठी या सर्व मागच्या जन्मातील आठवणी आहेत हे भासवत होता, असा दावा केला जातो.

डॉ. दिनेश त्याच्या साक्षीत सांगतो की, तो जेव्हा १५ वर्षाचा होता - म्हणजे १२ वर्षांपूर्वी - त्याने दिनदयाळला धमकी दिली होती, हे खरे आहे. कारण, दिनदयाळ, दिनेशच्या आईचा गुरूबंधू या नात्याने आईवडिलांना आपल्या तालावर नाचवत असे. त्याला असा संशयही होता की, गुरूबंधूचे नाते हा केवळ एक मुखवटा होता आणि त्याची आई आणि दिनदयाळ यांचे अनैतिक संबंध होते. परंतु ती शंका खरी नव्हती. गेल्या १२ वर्षांपासून दिनेश पुण्यांत आहे. आणि त्यांचा व दिनदयाळचा काहीही संबंध राहिलेला नाही.

दोन्ही बाजूच्या साक्षीपुराव्या नंतर कोर्ट ३ मुद्यांवर निर्णय देते.

१) पुनर्जन्माचा मुद्दा हा अप्रस्तुत आहे.

२) दोन व्यक्तिंमधला १२ वर्षापूर्वीचा भावनिक संघर्ष, हा षडयंत्र रचायला पुरेसा नाही.

३) सादर केलेले पुरावे आणि साक्षींवरून शाबित होत आहे की, दिनदयाळने खोटे दस्तऐवज तयार करणे, काननचा खून करणे व अनूवर खूनी हल्ला करणे किंवा त्याला उत्तेजन देणे यासारखे गंभीर गुन्हे केले आहेत. म्हणून कोर्ट त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावत.

***

## अंतरंग
## भाग १
## दृश्य १

(शरद कुलकर्णीचा बंगला, सकाळची वेळ. दरवाज्याच्या कोयंड्याला पेपर अडकवून आणि बेल वाजवून पेपर टाकणारा मुलगा उभा आहे. वय १५/१६ दिसायला स्मार्ट आणि बोलण्यात चतूर. त्याचं नाव माधव. उमा दरवाजा उघडून पेपर व दुधाची पिशवी उचलते. पेपराच्या आत एक हिंदी मासिक असलेलं उमाला दिसते. )

उमा : माधव, हे काय दिलयंस् रे ?

माधव : मॅगेझीन !

उमा : ते दिसतंय्. पण मी मराठी मासिक मागवलं होतं.

माधव : उमाताई, आता हिंदी बोलायची, वाचायची सवय करा. डॉ. दिनेश बरोबर तुमचं लग्न व्हायचंय्. कियेला-दियेला असलं हिंदी चालणार नाही. (उमा माधवचा कान धरते. )

उमा : बदमाश् ! दिनेश चांगलं मराठी बोलतो. गेली बारा वर्षे तो पुण्यात आहे.

माधव : माहित आहे मला. आई ग ! सोड-सोडा !

(कान सोडवून घेऊन माधव पळ काढतो. उमा हसून मागं वळते. )

## अंतरंग
## भाग १
## दृश्य २

(दिवाणखाना. (पपा) शरद जमिनीवर -सतरंजीवर आरामात बसले आहेत. समोर असलेला बिल्डींगचा नकाशा बघत आहेत. अनुश्री पप्पांच्या मांडीवर डोकं ठेवून लोळत आहे. कॉमिक्स वाचत आहे. उमा प्रवेश करते इंग्रजी वर्तमानपत्र पप्पांना देते. त्याचवेळी अनुश्रीची आई प्रवेश करते. )

आई : अहो ! लॉकरमध्ये ३०००/- रूपये ठेवले आहेत. ऑफिसला जातां जातां इन्शुअरन्सचा हप्ता भरून टाका. उमा, पापांना आठवणं कर. अनु, ताईला त्रास देऊ नकोस हं.. .. मी निघते. आधीच उशीर झालाय्.

अनु : बाय मम्मी ! (आई जाते. ) ताई, मराठी पेपर मला दे.

उमा : नाही देणार. आज आधी मी वाचणार !

अनु : तू कधी वाचणार ? आई ऑफिसला गेली म्हणजे उरलेलं सगळं काम तुलाच करायचं आहे.

उमा : तू महाराणीसारखी पडून रहा. आणि सगळी कामं मी करते ! ते काही नाही, चल उठ. आपली खोली आवरुन ठेव जा पटकन्.

अनु : पप्पा बघा ना, ताई पेपर देत नाहीये.

बाबा : उमा.. .. . (दोघी एकमेकीकडे बघून वाकुल्या दाखवतात, चिडवतात. )

उमा : पप्पा, तुमच्या लाडामुळं ती आपल्या सगळ्यांवर हुकूम गाजवायला लागलीय. आगाऊ कुठली !

बाबा : जाऊ दे गं ! तू नंतर वाच पेपर ! नाहीतरी दुपारी घरीच असतेस तू !

उमा : मी माझ्या मर्जीनं घरी बसून राहत नाही ! तुम्ही मला नोकरी करू देत नाही. मग एम. बी. ए. पर्यंत शिकवलंत् कशाला ?

बाबा : शिकवल तुझ्या हट्टासाठी. राहता राहिला नोकरीचा प्रश्न ! तो तुझ्या आणि दिनेशमधला प्रश्न आहे. त्याला पटव ! तुझ्या सारख्या हुशार मुलीला कुणीही नोकरी देईल.

अनु : दिनेशच्या डोक्यावर ते भूत बसलय् ना.. . म्हणे मुलींनी नोकरी करू नये !

बाबा : अनु, मोठ्या माणसाबद्दल असं बोलतात का ?

अनु : मी ताईच्या मनातलं बोलले !

उमा : तू गप् बस् गं !

अनु : कुमारी एम्. बी. ए. ! दूध आलं आहे. ताज्या दुधाचा चहा मिळेल कां ?

उमा : आता तोंड बंद ठेवलं नाहीस, तर चहाऐवजी एक झापड मिळेल.

अनु : असं मी नाही, पप्पा विचारणार होते ! हो की नाही पप्पा ?

उमा : महाबनेल झाली आहेस तू.

(अनुच्या गालावर हलकी चापट मारुन उमा जाते. )

बाबा : कां तिला त्रास देतेस उगीच ?

अनु : मी त्रास दिलेला ताईला आवडतं !

बाबा : कशावरुन ?

अनु : किती नाजुकपणे चापट मारली ताईनं, ते बघितलं नाही तुम्ही ?

बाबा : अच्छा ! अच्छा ! म्हणजे आत्ता तुमच्या दोघीत जे काही चाललं होतं, तो प्रेमाचा प्रकार होता तर !

अनु : होयचं मुळी !

उमा : (त. ज. ) अनु ! (त्याच वेळी उमाची हाक ऐकु येते. )

अनु : आले ऽ आले ऽ ! (अनु जाते. )

(क्षणभरात उमा चहाचा कप पपांना देऊन निघून जाते. )

उीं ैं

# अंतरंग
## भाग १
## दृश्य ३

(उमा व अनुची बेडरूम, कपडे, कागदांचे तुकडे, गवत, झाडांची वाळलेली पानं, कात्री, दोरा, डिंकाची ट्युब, इ. वस्तू खोलीत इतस्ततः पसरलेल्या आहेत. उमा अनूचा कान पकडून खोलीत घेऊन येते. )

उमा : हे सगळं काय आहे ?

अनु : हस्तकलेच्या वस्तू आहेत त्या !

उमा : हल्लीच्या मुली कॉम्प्युटर गेम्स खेळतात! आणि तू हा असला कचरा गोळा करतेस ? उचल ते सगळं, आणि बाहेर फ कून दे !

अनु : ताई, प्लीज ! आज रात्रीपर्यंत फ्लोट तयार होईल नंतर.

उमा : कसलाफ्लोट ?

(अनु पुढं होऊन कपाटाखालचा हार्डबोर्डचा मोठा तुकडा काढते. त्यावर ग्रामीण भारताची एक झलक दिसते. एकीकडे ड्रॉईंग पेपरच्या झोपड्या, त्यावर गवताचं छप्पर, मध्ये ट्रॅक्टरनं शेत नागरणारा शेतकरी, दुसऱ्या कोपऱ्यात एक झाड आणि झाडाखाली पडलेली चांभाराची हत्यारं.. .. वगैरे)

अनु : ताई, बघ हं ! हा ट्क्टर कालच विकत घेतला दामूनं ! (हसते. )

उमा : असलं दृश्य कुठं बघितलंस ? का मिसूनं सांगितलं ?

अनु : (छदमीपणे हसून) आमच्या मिसूनं आपलं शहर सुद्धा पूर्ण बघितलं नसेल !

उमा : मग तू हे सर्व कुठं पाह्यलंस ?

अनु : ताई, तू म्हणजे. .. आमच्या हँडीक्राफ्टच्या मिस् म्हणतात की, पेंटींग हस्तकलेच्या वस्तू, फोटोग्राफस्.. . जसे दिसतात तसे पहावेत. त्यात का, केंव्हा, कसं, कुठं असे प्रश्न विचारु नयेत.

उमा : बरं बाई ! एक शंका विचारु ? इथं फक्त चांभाराची हत्यारं दिसतायत्. चांभार कुठाय ?

अनु : शू करायला गेलाय् (करंगळी दाखवते. )

उमा : शीः, घाणेरडी कुठली, - हे सर्व बाजूला ठेव. आठ वाजलेत.. .. .

अनु : आठ ? अरे बाप रे.. .. .

(सर्व पसारा तसाच टाकून अनु पळ काढते. उमा सर्व वस्तू एका बाजूला सारते. बिछान्यावर चादर घालते. अनू कंगवा घेऊन येते. )

अनु : ताई लवकर वेणी घाल. आज पोनी टेल बांध!

(उमा अनूचे केस विंचारायला लागते. )

उमा : अनु, आता ही सगळी कामं तुझी तुला करायला पाहिजेत ! तुला ठाऊक आहे ? मी तुझ्या एवढी होते ना, तेव्हा आईला स्वयंपाकात मदत करायची. स्वतःची कामं स्वतः करायची, तुला सांभाळायची.

अनु : कारण तुला ताईच नव्हती. (उमा अनुला जवळ घेते. )

उमा : मी दिनेश बरोबर गेल्यावर काय करशील ?

अनु : मी भाऊजींना सांगीन की, तुम्हीच इकडे रहायला या. (त्याचवेळी बाबा हाक मारतात. )

बाबा : (त. ज. ) उमा, काय करतीयस ? दिनेश केव्हाची तुझी वाट पहातोय.

उमा : आलेऽआलऽऽऽ ! अनू ते आता इकडं तिकडं न गमता सरळ आंघोळीला जा.

अनु : होय !

(उमा जाते. अनु कपाटाच्या आरशात बघते. कपाटातून शाळेचा ड्रेस, टॉवेल काढून घेते. जाऊ लागते. )

## अंतरंग
## भाग १
## दृश्य ४

(दिवाणखाना. बाबा आणि दिनेश बिल्डींगचा नकाशा (प्लॅन) बघताहेत. बाबा एक्सप्लेन करताहेत.

बाबा : हे ऑपरेशन थिएटर.. . या दोन स्पेशल रूम्स.. . ही पॅन्ट्री.. . या कन्सल्टेशन रूम्स. तुझी आणि तुझ्या सहकारी डॉक्टर्सची. .. हे व्हिजिटर्स लाऊंज.. ..

दिनेशः फॅन्टॅस्टिक ! पप्पा! मला वाटतं की, तुम्ही डॉक्टर झाला असता तर, अगदी असलंनर्सिंग होम बनवलं असतंत्.

बाबा : डॉक्टर नसलो म्हणून काय झालं ? डॉक्टरचा सासरा तर आहे ना! (दोघे हसतात. )

(उमा चहाचे २ कप घेऊन येते. )

दिनेशः उमा, बघितलंस, पापांनी आपल्या नर्सिंग होमचा किती सुंदर प्लॅन काढलाय् ! (चहाचा घोट घेऊन) आणि आमची लाडकी, चिकणी मेहुणी कुठाय ?

उमा : आंघोळीला गेलीय्.

बाबा : दिनेश दुसऱ्या मजल्याचा प्लॅन पण बघून घे.

दिनेशः नाही, पपा, आता तुमचा शब्द अखेरचा ! सध्या हा ग्राऊंड फ्लोअरचा प्लॅन बिल्डरला देऊन काम सुरु करायला सांगतो.

बाबा : दिनेश, सुनंदा म्हणत होती की बॅंकेच कर्ज मंजूर व्हायला, कदाचित आणखी एक महीना तरी लागेल.

दिनेशः नो प्रॉब्लेम ! बिल्डर माझा मित्रच आहे. पैशासाठी अडून बसणार नाही !

बाबा : माझ्या म्हणण्याचा अर्थ होता की, काम लवकर सुरु करणार असलास तर मी एक दिड लाख रूपये देऊ शकेन.

दिनेशः पप्पा, तसा मी निर्लज्ज माणूस आहे. पण, नर्सिंग होमसाठी मी एक पैसासुद्धा घेणार नाही तुमच्याकडून. उलट, हा प्लॅन तयार करण्याचेच पैसे मी तुम्हाला देणार आहे. चेक देऊ की कॅश ?

बाबा : तसा मी सुद्धा निर्लज्जच आहे. पण मी फक्त काही रेघोट्या मारल्या आहेत. बाकीचा प्लॅन उमाचाच आहे.

दिनेशः खरं की काय ? उमाचं डोकं इतकं सुपीक आहे, हे मला माहित नव्हतं ! (मान वेळावून उमा आपली प्रतिक्रिया व्यक्त करते. पप्पा दिनेश हसतात. )

दिनेशः बाबा, मी चलतो. (जातो. त्याच्या मागे उमा पण जाते. दोघे गेले या दिशेला बघून बाबा हसतां हसतां सामान आवरु लागतात. )

**अंतरंग**

**भाग १**

**दृश्य ५**

(उमा आणि दिनेश प्रवेशद्वारापाशी उभे राहून बोलत आहेत. )

उमा : तुझ्या बाबांचे पत्र आलं ?

दिनेशः त्यांचे पत्र यायचा प्रश्नच नाही. तुम्ही आलात तर आनंदच आहे. नाहीतर मी सगळे उपचार उरकून टाकीन. असंच लिहीलं होतं त्यांना.

उमा : आई-वडिलांना असं धमकावतं का कुणी ?

दिनेशः मग काय करू ? आणि तू कशाला काळजी करतेस ? माझ्यावर विश्वास नाही का तुझा ?

उमा : विश्वास नसता तर तुझ्यावर प्रेमच केलं नसतं !

दिनेशः मग झालं तर ! चिअर अप् ! सगळं ठीक होईल !

उमा : तुझ्या मनांत काय चाललेलं असतं ते ओळखणं कठीण होत चाललंय दिवसेंदिवस!

दिनेशः आता काय झालं ?

उमा : पप्पा पैसे देत होते तर नको कां म्हणालास ?

दिनेशः कमाल आहे ! त्या पैशावर माझा काय अधिकार आहे ?

उमा : अधिकाराचा प्रश्न नाही. पण पप्पांना तू खूप आवडतोस, त्यांचा विश्वास आहे तुझ्यावर.

दिनेशः दॅटस् इट् ! माझ्यावरच्या त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ नये म्हणूनच मी धडपडतोय् ! कळलं?

उमा : मला एवढंच कळतंय की, लवकरात लवकर आपलं नर्सिंग होम तयार झालं तर आपलं लग्न पण. (लाजते. )

दिनेशः (हळू आवाजात) लग्नाची इतकी घाई झाली असेल तुला, तर.. ..

(अनुश्री प्रवेश करते. )

अनु : दिनेशदादा, काय कुजबुज चाललीय ?

दिनेशः उमाला पळवून नेण्याचा कट रचतोय !

अनु : पण पपांनी लग्नाला परवानगी दिलीय ! तरीही मुलीला पळविण्याची हौस असेल तर मला पळवून न्यावे लागेल.

उमा : तू गप बस गं ! अरे देवा ! तू टॉवेल गुंडाळून आली आहेस बाहेर ? लाज शरम काही आहे की नाही ? दिनेश, संध्याकाळी भेटू. चलगं.

(उमा अनुच्या दंडाला धरून ओढत आंत नेऊ लागते अनु वळून दिनेशला बाय करते. )

**अंतरंग**

**भाग १**

**दृश्य ६**

(दिवाणखाना -टेलिफोनची घंटा वाजत आहे. धावत येऊन अनुश्री टेलिफोन उचलते. आता ती शाळेच्या युनिफॉर्ममध्ये आहे. )

अनु : हॅलो ? पियुष ? बोल ! माय गॉड ! ठीक आहे. तू रिक्षा घेऊन ये. मी आमच्या गेटसमोरच उभी राहते. बाय. (टेलिफोन ठेवते. ओरडून उमाला सांगते. ) ताई, माझा डबा लौकर भर. आज स्कुल बस येणार नाहीये! रिक्षासाठी १५ रू. पण देऊन ठेव.

(उमा गडबडीत प्रवेश करते. डबा आणि १५ रू. देऊन अनुची पाठवणी करते आणि हुश करून सोफ्यावर बसते. )

**अंतरंग**

**भाग १**

**दृश्य ७**

(कच्चा रस्ता, रस्त्याच्या दोन्ही बाजूस झोपड्या आहेत. पियुष व अनु चालत आहेत. )

पियुषः आज काय झालंय् कळतच नाही. बस बंद, रिक्षा बंद. रिक्षातलं पेट्रोल इथंच कसं संपलं ? चालत जायची पाळी आली.

अनु : चालायचंच् ! होतं असं कधी कधी. ..

(थोडं अंतर चालून गेल्यावर एका झोपडीतून एक तगडा माणूस १७/१८ वर्षाच्या मुलीला ओढत. प रप टत बाहेर आणताना दिसतो. ती मुलगी किंचाळते. )

मुलगीः मी येणार नाही. बाबा, बाबा, मला वाचवा.

माणूसः कशी येत नाहीस, बघतोच ! नवऱ्याला सोडून बापाच्या घरी रहायची अवदसा आठवलीय तुला ? चल.

(मुलीचे केस धरून खेचतो. मुलगी आणखी ओरडायला लागते. )

(पियुष आणि अनु घाबरल्या आहेत. एकमेकीला चिकटून उभ्या आहेत. )

पियुषः अनू, चल घरी परत जाऊ या.

अनु : तू घाबरु नकोस गं.. ते बघ, त्या मुलीचे आईबाप आलेत. बघू या काय करतात ते. .. ..

(एक स्त्री व पुरूष झोपडीच्या बाहेर येतात. )

स्त्री : जा पोरी, आपल्या नवऱ्याकडं जा. (दुसऱ्या पुरूषास) तू समजाव पोरीला आणि नाहीच ऐकलं तर कमरेत लाथ घाल तिच्या.

(पुरूष काहीच बोलत नाही. फक्त बिडी पीत राहतो. बाजूच्या झोपडपट्टीतून २/३ स्त्री-पुरूष बाहेर येतात. परंतु कुणी काहीच बोलत नाही. मदत करत नाही. मुलगी ओरडत राहते. )

मुलगीः अरे कुणीतरी वाचवा मला. मी त्या राक्षसाकडे नाही जाणार. वाचवा.. .. कुणीतरी मला मदत करा हो.. ..

(आता अनुला जरा धीर येतो. अनू झोपडीकडं जाऊ लागते. पियुष आणखीनच घाबरते. ती अनुला मागे खेचते. )

पियुषः अनु, तिकडं कुठं निघालीस ? शाळेला उशीर होतोय्.. . चल.. ..

अनु : तू चल तर माझ्या बरोबर.. ..

(दोघी झोपडीजवळ येतात. )

अनु : ए, काय चालवलंयस हे ?

माणूसः तुला काय करायचय् ? चालती हो इथून.

मुलगीः नाही (अनूचा हात धरून ठेवते. ) मला सोडवा. माझ्या बापानं ठेकेदाराकडून पैसे घेऊन मला विकलं आहे. रोज दारू पिऊन येतो. मला मारहाण करतो, किती सहन करू मी ?

माणूसः मग काय तुझी पूजा करेल ? आजूबाजूच्या मुलांबरोबर टवाळी करत फिरतेस ! तुझी खेटरानंच पूजा करायला हवी.

अनु : ते काहीही असू दे. मुकाट्यानं सोड तिला.

(अनु त्या मुलीचा हात सोडवाचा प्रयत्न करते. थोडावेळ तिघांची झटापट होत. अनू त्या माणसाच्या थोबाडीत मारते. पियुष 'पोलिस पोलिस' असे ओरडत राहते. )

## अंतरंग

## भाग २

### दृश्य १

(अनुश्रीचं घर. बाहेरचा भाग. दरवाज्यासमोर अन, पियुष आणि त्यांची टीचर मिस् झरीन उभ्या आहेत. अनुच्या डोक्याला बँडेज बांधले आहे. स्कर्टवर रक्ताचे डाग पडले आहेत. झरीन दरवाजावरची बेल वाजवते. उमा दार उघडते. अनुला तशा अवस्थेत पाहून घाबरते. )

उमा : अनू काय झालं ? पियुष काय झालं गं ?

झरीनः आपण आत चला. मी सर्व काही सांगते तुम्हाला. (चौघी दिवाणखान्यात येतात. )

उमा : आपण ?

पियुषः उमा दीदी, या आमच्या क्लास टीचर. मिस् झरीन् ! आणि आणि मिस्, ही अनुची थोरली बहिण, उमा दीदी !

झरीन : उमा अनुश्रीला आत घेऊन जा. तिचे कपडे बदल आणि तिला विश्रांती घेऊ दे. पियुष तू कुठं निघालीस ? तू गप्प बस इथं. मधे मधे बोलू नकोस. समजलं ?

(अनु आणि उमा जातात. झरीन व पियुष सोफ्यावर बसतात. एकमेकींकडे बघतात. पियुष नजर खाली वळवते. )

झरीन : तुम्ही दोघी आपल्या शाळेच्या आदर्श विद्यार्थिनी आहात. तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती.

पियुष : आय् ॲम सॉरी मिस् ! पण.. ..

झरीन : पण बिण काही नाही. सबब सांगू नकोस. चूक ती चूकच ! एक चूक लपविण्यासाठो शंभर वेळा खोटं बोलावं लागतं.

पियुष : शाळेत येताना काय झालं ते कुणाला सांगू नकोस. असं अनूनच बजावलं होत मला.

झरीन : आता अनुचे आई-बाबा, डॉ. दिनेश सगळे धावत येतील. त्यांना सर्व सांगावच लागेल. तुमच्यासाठी मी नाही खोटं बोलणार !

(त्यावेळी डॉ. दिनेश गडबडीत प्रवेश करतो. क्षणभर थांबतो.. .. दोघींकडे बघतो आणि आत जातो. )

झरीन : मला वाटतं हेच डॉ. दिनेश !

पियुष : यस् मिस् ! (आई बाबा येतात. सरळ आत जातात. )

झरीन : डोन्ट क्राय माय चाईल्ड. आता रडून काय उपयोग ? तू आपल्या शाळेची आदर्श विद्यार्थिनी आहेस. थोडसं धाडस दाखवलंस तर सर्व काही व्यवस्थित होईल.

(आई, बाबा, उमा व दिनेश दिवाणखान्यात प्रवेश करतात. )

उमा : पपा, या अनुच्या वर्गशिक्षिका, मिस् झरीन !

बाबा : थँक यू, मिस् झरीन. अनूला घरी पोहोचविण्याचा त्रास झाला तुम्हाला.

झरीन : त्यात त्रास कसला ? आमची पण काही जबाबदारी आहेच की.. ..

बाबा : मॅडम, हे सर्व कसं घडलं ?

झरीन : शाळेबाहेर काय आणि कसं झाले ते पियुषला आणि अनुश्रीलाच माहिती. पण वर्गात जे घडलं ते, बाप रे !! आठवलं तरी अंगाला घाम सुटतो. पियुष, तू आत जाऊन अनुजवळ बस बेटा !

(पियुष आत जाते. झरीन अति उत्साहात आणि नाटकीपणाने बोलायला सुरुवात करते. )

झरीन : तर काय झालं की, प्रेअर संपल्यानंतर वर्ग सुरु झाला. ही हजेरी घ्यायला सुरवात केली. मी दोन वेळा अनुचा नंबर पुकारला. पण काहीच उत्तर आले नाही. म्हणून मी तिच्याकडं रोखून बघितलं. तर अन् तिच्या वहीमध्ये स्केच काढीत होती.

दिनेशः मॅडम, प्लीज् थोडक्यात सांगा.

झरीन : हे पहा, सर्व गोष्टी मला, मिस्टर आणि मिसेस कुलकर्णींना सविस्तर आणि स्पष्टपणे सांगायला पाहिजेत ! कारण ते तिचे आईवडील आहेत.. . तर मला असं दिसलं की अनु स्केच काढण्यात गुंग झाली होती.. .

दिनेश : तुम्ही तिला जवळ बोलावलंत.

झरीन : तिच्या वहीसकट.

ऊीं ीं

**अंतरंग**

**भाग २**

**दृश्य २**

**फ्लॅश बॅक**

(क्लासरूम, खुर्ची, टेबल मागच्या भिंतीवर फळा. झरीन बसली आहे. प्रेझेंटी मार्क करीत आहे. )

झरीन : साधना टेंबे.

मुलगीः येस् मॅम.

झरीन : पियुष मोघे.

पियुष : यस् मॅम.

झरीन : सुदेश भोसले. (मुलांचा गोंधळ आणि हंसा. )

झरीन : सायलेन्स! असं होतं कधी कधी. त्यात हसण्यासारखं काय झालं? सुदेश भागवत.

सुदेश : प्रेझेंट मॅम.

झरीन : अनुश्री कुलकर्णी.. . अनुश्री कुलकर्णी. .. अनू. .. कम् हिअर वुईथ युवर नोट बुक, तू हजेरी का दिली नाहीस ?

अनुः मी थोड्या वेळासाठी माझ्या गावी गेले होते. हे पहा.. ..

(वही दाखवते. वर्गातल्या इतर मुला-मुलींचा हसण्याचा आवाज. )

झरीन : (समोर बघून) सायलेन्स ! या चित्रात जी मुलगी तू काढली आहेस, तिलाच तू सकाळी सोडवलंस ?

अनुः नाही मिस् ! ही मुलगी तर मीच आहे.

झरीन : काय ?(मुला-मुलींचा हसण्याचा आवाज. ) सायलेन्स ! या स्केचमधे काढलायस तो गुंड कोण आहे ?

अनुः  तो ? त्या हलकट म्हाताऱ्याचा चमचा आहे.

झरीन : (घाबरुन) कोण ? कोण म्हातारा ?

अनुः  दिनदयाळ, आमच्या गांवचा सावकार. त्यांनच मला विकत घेतलं होतं !

(जोरात गोंगाट.. .. . )

झरीन : सायलेन्स ! आर् यू ओके माय चाईल्ड ?

अनुः  यस् मिस् !

झरीन : मग तू हे सगळं काय बडबडत आहेस ?

अनुः  मला जे दिसतंय्, जे आठवतंय् तेच मी सांगतेय्. .. .

झरीन : ओ गॉड ! मला हे सर्व हेडमिस्ट्रेसना सांगितलंच पाहिजे.. .

(झरीन गडबडीन वहीचं पान फाडते. उडते व जाते. वर्गातली मुलं गोंधळ घालतात अनु वही वर उडवते. )

- फ्लॅश बॅक समाप्त -

# अंतरंग
## भाग २
## दृश्य ३

(दिवाणखाना. झरीन आपल्या पर्समधून एक स्केच काढते. बाबांजवळ देते. एक एक करून सगळ्यांनी स्केच पाहिल्यावर शेवटी ते दिनेशकडे जातं. स्केचचा क्लोज अप. एक पेहलवान, एका सुंदर मुलीचे केस धरून, तिला ओढत ओढत एका हवेलीच्या प्रवेशद्वारापाशी आला आहे असं ते दृश्य आहे. )

झरीन : डॉ. दिनेश तुम्ही अनुचे फॅमिली डॉक्टर आहात. पण मला वाटतं की, अनुला एखाद्या स्पेशालिस्टला दाखवून त्याचा सल्ला घ्यावा. कारण अनुच्या डोक्यावर थोडा परिणाम.. ..

दिनेश : मिस झरीन.. .. आपल्या ॲडव्हाइसबद्‌दल थँक्स्. मी अनुला तपासलं आहे. तिच्याशी बोललो आहे. आपल्या सर्वांपेक्षा तिचं डोकं नक्कीच ठिकाणावर आहे.

झरीन : पण आमची काही जबाबदारी आहे की नाही ? अनू मागच्या वर्षी आमच्या शाळेची आदर्श विद्यार्थिनी ठरली होती. आणि. .. ..

दिनेश : मॅडम, तुम्ही अजिबात काळजी करू नका. पुढल्या वर्षीही अनूच आदर्श विद्यार्थिनी राहणार आहे. (पियुष बाहेर येते. )

झरीन : तू बाहेर कां आलीस ?

पियुष : अनु झोपलीय, मग तिथं बसून काय करू ?

झरीन : चल. मी तुला घरी साडते.

पियुष : थँक् यू मिस् ! पण मी एकटी जाऊ शकते.

झरीन : हेडमिस्ट्रेसनी तुमच्या दोघींची जबाबदारी माझ्यावर टाकली आहे. चल्. गुड बाय् एव्हरीबडी. (दोघी जातात. )

दिनेश : चला ! सुटलो बुवा एकदाचा ! मिस् झरीन आणखी २/४ मिनिटं जरी इथं थांबली असती तर मी नक्कीच वेडा झालो असतो.. ..

उमाः यावेळी तुला चेष्टा-मस्करी सुचतेय ?

दिनेश : यावेळी. .. . म्हणजे ?

उमाः अनू कुठल्या परिस्थितीतून जातेय्.. ..

दिनेश : उमा, तिला काहीही झालेलं नाहीए ! पप्पा, मी खरंच सांगतोय्.. . ती अगदी नॉर्मल आहे.

बाबा : पण ते स्केच ? आणि ती सारखं म्हणत होती की 'मी गावाला गेले होते. त्या हलकट म्हाताऱ्यानं मला विकत घेतलं होतं.. . ' ह्या सगळ्याचा अर्थ काय ?

दिनेश : कधी कधी काय होतं की, आपल्या सब्कॉन्शस्- अचेतन मनात - खूप माहिती साठवलेली असते. पाहिलेली, वाचलेली किंवा ऐकलेली ! एखादी घटना, एखादा अपघात झाला की, अचेतन मनाला जाग येते आणि साठवलेली माहिती जागृत मनापर्यंत पोहोचवली जाते. आणि माणूस त्या माहितीच्या आधारे बोलू लागतो. त्याच्या बोलण्यातले संदर्भ आजूबाजूच्या मंडळींना माहित नसल्यानं ती मंडळी साहजिकच घाबरतात. अनुच्या बाबतीत असंच काहीसं घडलंय् ! एक गोष्ट आठवली, बोलून टाकली, थोड्या वेळानं त्या गोष्टीचा विसर पडला ! मॅटर अेंडस् देअर !! इट् इज सो सिंपल.

उमा : दिनेश, तसं असलं तरी मला फार भीती वाटतेय् रे !

दिनेश : तुझ्या ड्रेसिंग टेबलवर मी जास्तीच्या दोन गोळ्या ठेवल्या आहेत. रात्रीच्या जेवणानंतर एक गोळी घे. सकाळपर्यंत भीती बिती सर्व पळून जाईल.

(दिनेश हसतो. आई-बाबा पण त्याच्या हसण्यात सामील होतात. काही क्षणानंतर.. .. )

दिनेश : ठिक आहे, पप्पा, मी निघतो.

उमाः अरे ! चहा तरी पिऊन जा !

दिनेश : छे छे ! आता मला वेळ नाही ४ वाजता एका पेशंटची ॲपॉईंटमेंट आहे. बाय ! (दिनेश जातो. तो गेल्यावर उमा आणि आई निघून जातात. )

बाबा : माणसाचं मन म्हणजे न उकलणारं कोडं आहे !
(पप्पा एका बिंदूत नजर रोखून बसून राहतात. )

ऊँ ँ

**अंतरंग**

**भाग २**

**दृश्य ४**

(रात्र. अनुश्री व उमाची बेडरूम. अनुश्री गाढ झोपेत आहे. तिच्या पलंगाजवळ उमा आणि आई बसलेल्या आहेत. आई डुलक्या घेत आहे. उमा पुस्तक वाचत आहे. क्षणभरांन उमा आईला जागं करते. )

उमाः मम्मी, ए मम्मी.

आई : अे ? काय झालं गं ?

उमाः घाबरु नकोस. काही झालेल नाही. तू जाऊन झोपतेस का ?

आईः पण.. .. अनुनं काही खाल्लं नाही आज !

उमाः मी आहे ना? काळजी करू नकोस, सकाळी बँकेत जायचं असतं तुला. जाऊन झोप ना.

(आई जाते. उमा वाचत बसते. काही वेळानंतर अनु जागी होते आणि उठून बसते. )

अनुः ताई !

(उमा पुस्तकं ठेवून चटकन् अनुजवळ जाऊन बसते. अनु उमाच्या गळ्यात हात घालून परत डोळे मिटून स्वस्थ होते. )

उमाः आता कसं वाटतंय् ?

अनुः डोकं अलकं झाल्यासारखं वाटतंय ! किती वाजले ताई ?

उमाः रात्रीचे १० वाजून गेलेत !

अनुः अरे बापरे ! शाळेचं दप्तर भरायचंय् !

(पलंगावरून खाली उतरु लागते. उमा तिला थांबवते. )

उमाः मिस् झरीन म्हणत होती की अनुला दोन-तीन दिवस विश्रांती घेऊ दे. शाळेत आली नाही तरी चालेल !. .. .. तू जेवणार आहेस का ?

अनुः भूक नाहीए ! थोडं दूध देतेस ?

उमाः चल्. (दोघी उठून उभ्या राहतात. )

अनुः मम्मी, पप्पा झोपले ?. .. . ताई मिसनं ते स्केच पप्पांना दाखवलं नाही ना ?

उमाः जाऊ दे गं. त्याबद्दल तू विचारच करूं नकोस.

अनुः कसा करूं नको विचार? तो म्हातारा समजत होता की, गाय-बकरीप्रमाणे मुली पण विकत घेऊ शकतो, डांबून ठेवू शकतो, त्यांना मारहाण करू शकतो.

उमाः मम्मी, पप्पा, लवकर या.. .. . अनू जागी हो.. .. अनू शुद्धीवर ये.. ..

अनुः मी पूर्ण शुद्धीत आहे. म्हणून तर तुला सांगते की, त्या हलकट थेरड्याला मी असा धडा शिकवणार आहे की.. .. .

उमाः अनू, काय बोलतीयस हे ? मम्मी, पप्पा.. .. .

उमाः (अनूला जवळ घेऊन तिचं तोंड बंद करण्याचा प्रयत्न करते. ) गप्प बस, अनू प्लीज.. .. . गप्प् बस ! अशी वेड्यासारखी गडबड करूं नकोस.

(पप्पा, मम्मी लगबगीनं प्रवेश करतात. अनू कपाळावर हात मारुन घेऊन पलंगावर बसून राहते. )

**अंतरंग**
**भाग २**
**दृश्य ५**

(बंगला, ड्रॉईंग रुम. कोपऱ्यात डायनिंग टेबल आहे. उमा आणि मम्मी चहा पिता पिता काम करत आहेत. उमा भाजी चिरत आहे. आणि मम्मी उकडलेल्या बटाट्यांची सालं काढत आहे. नेहमीप्रमाणे पप्पा सतरंजीवर बसून पेपर वाचण्यात दंग आहेत. चहाचा आस्वाद घेत पेपर वाचन सुरु आहे. पप्पांच्या मांडीवर डोकं टकवून अनुही मराठी पेपर वाचत आहे. अधून मधून उठून ती सुद्धा चहाचे घोट घेते. )

मम्मी : अनू नीट उठून बैस. आणि आधी तो चहा संपव. सगळी कामं रेंगाळत करायची, ही कसली सवय ? आणि आता तू मोठी झालीयस. छोट्या छोट्या कामांत मदत करायची सवय लावून घे. यापढं पप्पांचा आडोसा घेतलेला चालणार नाही.

उमाः जाऊ दे गं, मम्मी.

मम्मी : अगं कसं जाऊ देऊं ? आज रविवार. कोणी न कोणी भेटायला येणार आणि ही अशी लोळत पडलेली. बरं दिसतं का ?

अनुः बरं बाई. नीट उठून बसते. मग तर झालं ?

(अनू उठून बसते. चहाच्या कपाला धक्का लागतो. थोडा चहा सांडतो. पण तिकडे दुर्लक्ष करून आणि जागा बदलून परत वाचूं लगते. उमा आतून बोळा आणून चहाचे डाग पुसते. )

अनुः (पेपर वाचतां वाचतां) पपा, पुनर्जन्म म्हणजे काय हो ?

पपाः पुनर्जन्म म्हणजे री बर्थ. पुन्हा जन्म घेणे. कां गं ? आजच कां हा प्रश्न विचारलास ?

अनुः	पेपरमध्ये बातमी आली आहे की एक माणूस कित्येक वर्षं दारुच्या व्यसनांत बुडलेला होता. पण अल्कोहोलिक ॲनॉनिमस संस्थेने त्याला व्यसनमुक्त केलं. त्याचा जणू पुनर्जन्म झाला आहे.

पपाः	हां हां ! इथे त्याचा अर्थ आहे नवीन जीवन. व्यसन-मुक्त झाल्यामुळे त्याला नवजीवन मिळालं आहे !

मम्मी :	तू ह्या असल्या. बातम्या वाचतेसच का? उद्यापासून तुझं पेपर वाचणं बंद कळलं.

अनुः	शीः बाई, मम्मी कुठल्यातरी गोष्टीचा संबंध भलतीकडे जोडते.

(पेपर प कून देऊन आणि चहाचा कप उचलून सोफ्यावर बसते. त्याचवेळेस बाहेरुन आवाज येता. )

रविः	अनू ऽ उमाऽ कुठे आहात तुम्ही ?

उमाः	(किंचित ओरडून) रवि, आम्ही इकडे आहोत. आंत ये.

(रवि प्रवेश करतो. त्याच्या हातांत व्यावसायिक कॅमेरा आहे. )

रविः	गुड मॉर्निंग पपा!

पपाः	गुड मॉर्निंग, गुड मॉर्निंग! रवि, म्हणायला तू आमचा शेजारी आहेस, पण चार-चार दिवस दिसत नाहीस. भेटत नाहीस, काय पत्ता काय तुझा ?

रविः	पपा, माझ्यासारख्या प्रेस रिपोर्टरला घरदार, ठाव ठिकाणा काही नसतं! आज येथे तर उद्या तिथं, काय करणार ? पाठवतील तिकड जावं लागतं!

उमाः	रवि, चहा घेणार ना ?

रविः	मुद्दाम करू नको. तयार असेल तर दे. (उमा चहा आणायला आत जाते. )

रविः (अनुकडे बघत म्हणतो. ) पपा, आज आपल्या या चॅटरींग बॉक्सला काय झालंय? एकदम गप्प गप्प आहे ? (दोघेही अनुकडे बघतात. )

अनुः माझ्याकडे लक्ष द्यायला जर कुणाला वेळ नसेल तर माझं तरी काय अडलयं.

रविः कम् ऑन यार! खरं तर मी तुलाच भेटायला आलो होतो. (अनुजवळ जाऊन बसतो. )

अनुः (गंभीरपणे) ए! थापा मारु नकोस. मावशी घरी नाही. म्हणून चहा प्यायला तू इथं आलायसं. (सगळे जण हसतात. उमा चहाचा कप घेऊन बाहेर येते. कप रविला देते. )

रविः अनू, तू कसं ओळखलंस मी चहा प्यायला आलोय् म्हणून.

अनुः मी तुला गेल्या बारा वर्षांपासून ओळखत्येय!

मम्मी : गप्प बैस. लहान नाही, मोठं नाही. काही कशाचं ताळतंत्रच नाही.

रविः मम्मी, अहो सध्या आपल्या समाजाला अशाच धीट मुलींची गरज आहे.

अनुः रविदादा, उगीच सगळ्यांना बोअर नको करुस हं! नाहीतर एक-एक करून सगळे निघून जातील. (सगळे हसतात. )

रविः ओके. ओके. महत्वाचं काम करून टाकतो. कॉग्रॅच्यूलेशन्स!! (अनुबरोबर शेकहँड करतो. )

अनुः कशासाठी ?

रविः झोपडपट्टीत तू जे धाडस दाखवंलंस, पराक्रम केलास त्यासाठी !

(अचानक वातावरण गंभीर होतं. आश्चर्याने सगळ्यांना न्याहाळत रवि विचारतो. ) काय झालं ?

उमाः रवि प्लीज हा विषय नको. दुसरं काहीतरी बोल.

रविः	अगं पण कां ? आज जागोजागी या बातमीचीच चर्चा चालू आहे. महिला दक्षता समितीच्या सेक्रेटरीचा सकाळीच फोन आला होता. म्हणत होती ही बातमी अनुच्या फोटो सकट फस्ट पेजवर छापा. आणि तू विषय टाळायचा प्रयत्न करतीयस. )

अनुः	मला नाही काढून घ्यायचा फोटो-बिटो! (जवळच्या पेपरमधला एक फोटो रविला दाखवते) रविदादा हा कुणाचा फोटो आहे ?

रविः	(फोटोकडे निरखून बघत. ) निटसं लक्षात येत नाहीये. पण बहुधा तो.. . आपला राजेश खन्ना नाही तर शाहरुखखान असेल.

अनुः	हितिक रोशनचा फोटो आहे. आजचा सुपरस्टार!! आणि तुमच्या पेपरवाल्यांनी त्याची काय अवस्था करून टाकलीय.

रविः	(हसुन) कधी-कधी छापतांना शाईचं प्रमाण चुकलं की हे असं होतं, पण तुझा फोटो मात्र.. ..

अनुः	नो !

उमाः	ती नको म्हणतेय ते राहू दे न.

रविः	ठीक आहे. राहीलं. आज नाही तर नाही. उद्या परवा वेळ येईलच. बरयं मी निघतो. (चहाचा घोट संपवून जातो. )

(अनू मम्मीला जाऊन चिकटते. किंचित लाडात येऊन म्हणते. )

अनुः	मम्मी मला भूक लागली आहे!

मम्मी :	आज स्वयंपाक बंद !

अनुः	मग मला पैसे दे. मी वडापाव, समोसे घेऊन येते.

मम्मी :	वेडाबाई, माझं बोलणं खरं वाटलं? अगं आज उमाने डोसे करण्याचा घाट घातलाय. पोटभर डोसे खा.

उमाः	आणि पपा, डिनरसुद्धा आपण बाहेरच घेणार आहोत. मम्मीला आज पूर्णपणे रेस्ट.

पपाः	ठीक आहे. दिनेशला येऊ दे. मग आपण प्रोग्राम निश्चित करूया.

उमाः	पपा, मला एक सांगा. दिनेशबरोबर लग्न कुणाचं होणार आहे, माझं की तुमचं ? (अनु हसू लागते. )

पपाः	म्हणजे काय ?

उमाः	तुम्ही पतिव्रतप्रमाणे प्रत्येक गोष्टीत दिनेशची मर्जी विचारात घेता. दिनेशला विचारा, दिनेशला सांगा, दिनेशला येऊ द्या, दिनेश नाराज तर होणार नाही ना ? इश्श!!

(अनु मोठमोठ्याने हंसू लागते. मम्मी पपांनाही हंसू आवरत नाही. नेमका त्याच वेळेस दिनेश प्रवेश करतो. )

दिनेश :	अरे वा ! क्या बात है! आज सगळे एकदम खुशीत दिसताय्? काही विशेष !

अनुः	(दिनेश जवळ जात. ) दिनेश भैय्या.

उमाः	(ओरडून) अनू, दिनेशला काही सांगितलंस तर याद राख! (उमा अनूला पकडायला जाते. अनू दिनेशच्या मागे लपते. तरीसुद्धा उमा अनुला पकडण्याचा प्रयत्न करते. )

अनुः	दिनेश भैय्या, मला वाचवा. (दिनेश उमाला धरून ठेवतो. )

दिनेश :	(उमा हळू आवाजात कुजबुजते) दिनेश सोड मला. मम्मी पपा बघताहेत. (स्वतःला सोडवून घेत उमा लाजून स्वयंपाकघरात जाते. अनू हसतेच आहे. दिनेश तिला सोफ्यावर बसवतो अन् स्वतःही बसतो. )

दिनेश :	हं! आतां सांग, काय म्हणत होतीस? (अनू हसतेच आहे) अगं सांगणार आहेस कीनुसती हसत बसणार आहेस!

अनुः	दिनेश भैय्या, तुम्ही लग्न कुणाबरोबर करणार आहात, उमाताईबरोबर की पप्पांबरोबर ?

दिनेश : (आश्चर्यानं) काय ?

अनुः पप्पा पतिव्रतेसारखं नेहमी तुमचा विचार करतात.. . दिनेशला विचारा.. . दिनेशला सांगा, दिनेशला येऊ द्या.. .. दिनेश नाराज तर नाही ना होणार?

दिनेश : असं कोण म्हणालं? उमा? कुठाय ती? (दिनेश हंसू लागतो. हसता-हसता किचनमध्ये जातो. दिनेशला बघून मम्मी बाहेर येते. दिनेश उमाला खोचकपणे विचारतो. )

दिनेश : का गं? पप्पांचा मी लाडका अहो म्हणून मत्सर वाटतोय ?

उमाः सगळं बरळली वाटतं ती.

दिनेश : पण मला खूप बरं वाटलं! तुम्ही सगळे अनूला आनंदीत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहात. असंच चालू ठेवा.

उमाः पण अनुच्या तब्येतीचा कधी कधी फार ताण येतो रे! केव्हां काय बोलेल करेल..

दिनेश : त्या दिवसानंतर अनू सावकाराबद्दल किंवा कानन बद्दल पुन्हा बोलली ?

उमाः नाही.

दिनेश : मग काळजी कां करतेस? हळूहळू तिला सगळ्याचा आपोआप विसर पडेल.

उमाः बरं, तू सुद्धा आमच्या बरोबर नाश्ता करणार आहेस ना ?

दिनेश : करणार म्हणजे? करणारचं. मी काय तुमच्या तोंडाकड बघत बसूं?

उमाः मग चल. बाहेर डायनिंग टेबलवर बस. अनू. टेबलावर सगळ्यासाठी डिशेस, बाऊल्स, चमचे मांड.

(अनु टेबल सजवू लागते. )

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे

लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत.

त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष

ई साहित्य प्रतिष्ठान

